


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६५६. वा | शुक्रवार | दि. १९ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचारातील बड्या माशांवर शिकंजा कधी?

## वरिष्ठ लिपिक तर अडकले, परंतु त्या बड्या भ्रष्टाचाऱ्यांवरही कारवाई अपेक्षित...

**पोस्टमार्टम ६३**

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेतील वरिष्ठ लिपिक बोथे नामक एक भ्रष्टाचारी मासा तर चौकशी समितीच्या गळाला लागला की लावला परंतु अद्यापही या ठिकाणचे अनेक बडे भ्रष्टाचारी अद्यापही मोकाट असून, त्यांच्यावर कारवाई होणार का की, केवळ बोथे यांनाच बळीचा बकरा केला जाणार, असा सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. त्यामुळे जर खऱ्या अर्थाने बड्या धेंडावर कारवाई झाली, तरच भ्रष्टाचाराचे या ठिकाणाहून उच्चाटन होऊ शकणार आहे. जिल्हा रुग्णालयात जो काही प्रचंड भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, त्यापासून आता सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचे वाचक / दर्शक अजिबात अनभिज्ञ नाहीत. कारण गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या ठिकाणच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड करीत आहे. जिल्हा रुग्णालयात एकीकडे प्रचंड अशी अनागोंदी बोकाळलेली आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. जिल्हा रुग्णालयातील अनेक झारीतील शुक्राचार्य हे सर्वसामान्यांच्या मुळावर उठलेले दिसून येत आहेत. त्यापैकीच एक महाभाग आहेत माजी भांडारपाल यांचा भांडारपालपदाचा कार्यकाळ हा पूर्णपणे भ्रष्टाचाराने काळवंडलेला आहे, यात काही शंका नाही. जिल्हा रुग्णालयात स्टेशनरी साहित्य व विविध उपकरणांमध्ये प्रचंड प्रमाणात घोळ झालेला आहे. त्याला प्रथमदर्शनी प्रकाश बोथे हे जबाबदार आहेत, हे अखेर चौकशी समितीलाही मान्य करावे लागले.खरे तर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सारखे वृत्तपत्र आणि काही विविध सामाजिक संघटनांचा दबाव, तसेच लोकप्रिय आमदार संजुभाऊ गायकवाड यांची विधानसभेतील लक्षवेधी या सर्वांचा दबाव नसता, तर या ठिकाणचा भ्रष्टाचार हा कधीही चव्हाट्यावर आला नसता. काहीही असले तरी जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार जनतेसमोर उजागर करण्याचे सर्वांत आधी श्रेय हे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचेच. कारण या भ्रष्टाचाराला सर्वांत आधी वाचा फोडण्याचे काम सिटी न्यूज व दैनिक जनसंचलननेच केलेले आहे. त्याला इतरांचीही साथ लाभलेली आहे. जिल्हा रुग्णालयात कोरोना महामारीच्या आधीपासूनच प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार माजलेला आहे. एकीकडे भांडार विभागातील भ्रष्टाचार, दुसरीकडे जिल्हा रुग्णालयाचे काळीज कॅशबुकातील आर्थिक घोळ देखील प्रचंड झालेला आहे. माजी रोखपाल पी. के. माळी यांनी त्यांच्या कार्यकाळात कॅशबुकात प्रचंड प्रमाणात खाडाखोड करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. प्रचंड भ्रष्टाचार करून पी. के. माळी हे तर जिल्हा रुग्णालयातून निसटले, परंतु विद्यमान रोखपाल आर. एस.लाकडे हे देखील भ्रष्टाचाराच्या या नंदनवनात मुक्तपणे संचार करीत आहेत. त्यांच्याकडे कोणतीही माहिती मागितली ते अत्यंत साळसूदपणाचा आणि निष्पापपणाचा आव आणतात आणि मला काहीच माहिती नसल्याचा बनाव करतात. त्यांनी माळी यांच्याकडून पदभार स्वीकारतानाही तो पूर्णपणे स्वीकारला नाही. खरे तर त्यांचा हा गंभीर प्रमाद आहे. परंतु जिल्हा रुग्णालयात सगळे काही खपून जाते. या रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये आलेले जिल्हा शल्यचिकित्सक तसेच वेगवेगळ्या काळात आरोग्य अधीक्षक पदावर येऊन गेलेले अधिकारी असे सगळेच दोषी आहेत. याचा स्पष्ट अर्थ आहे की, जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे सामुहिकीकरण झाले आहे.

उर्वरित पान ८ वर

**जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणात प्रश्न हा उदभवतो की सेवानिवृत्त रोखपाल पी.के. माळी यांनी पूर्ण चार्ज पदभार न देता व रोखपाल एस.आर.लाकडे यांनी पूर्ण चार्ज पदभार न घेता त्यांच्या अधिकारात असलेले करोडो रुपयांची देणी ही ऑडिट समितीला दिसून आली नाही का ? रोखपाल पी.के.माळी पूर्ण पदभार न देता सर्व नियमात असल्याचे दर्शवून त्यांना हजारो रुपयांची पेन्शन लागू कशी झाली? रोखपालचे अर्धवट पदभार घेतलेले प्रभारी भांडारपाल आर. एस.लाकडे हे जिल्हा सामान्य रुग्णालयात आजही कसे कार्यरत आहे. एवढीच मोजकी माहिती आम्ही जिल्हा प्रशासनासमोर मांडत आहो आरोग्य प्रशासनाने अर्धवट चौकशीवर किंवा अहवालावर गंभीर चौकशी करून झालेल्या करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून जमवलेली संपत्ती / अपसंपदा त्वरित शासन तिजोरीत जमा करून दोषींवर कारवाई व्हावी ही तमाम सामान्य नागरिकांचा कायद्यावरील विश्वास ठरेल**




# शेतकरी नेते रविकांत तुपकरांना अटक तुपकरांची रात्र पोलीस कोठडीतच...

**जनसंचलन/बुलडाणा**

सोयाबीन कापूस प्रश्नावर झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी १९ जानेवारीला मलकापूर रेल्वे स्थानकावरून मुंबई, दिल्ली व गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वे गाड्या अडविण्याचा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला होता. सदरचे आंदोलन दडपण्याच्या हेतूने बुलढाणा पोलिसांनी रविकांत तुपकरांना मलकापुरात पोहोचण्यापूर्वीच रात्री अटक केली आहे. तुपकर काल रात्रीपासून भूमिगत होते. त्यांच्या घराभोवती पोलिसांचा कडक बंदोबस्त होता तर त्यांना शोधण्यासाठी पोलिसांची अनेक पथके रवाना झाली होती. सायं.७.०० च्या दरम्यान गाडी बदलून मलकापूर कडे जात असतांना राजुर घाटात पाठलाग करून पोलिसांनी रविकांत तुपकरांना ताब्यात घेतले आहे व तिथून त्यांना बुलढाणा शहर पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले आहे.



कलम १५१अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना उद्या न्यायालयात हजर केल्या जाण्याची शक्यता आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांसाठी स्वागत कक्ष कार्यान्वित...

**जनसंचलन/बुलढाणा**

दि.१८ जानेवारी २०२४; जिल्ह्यातील सर्व औदयोगिक वीज ग्राहकांसाठी विद्युत भवन बुलडाणा येथे जिल्हा स्तरावर एक स्वतंत्र स्वागत कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहे. नविन वीज जोडणीसह वीज पुरवठ्याशी संबंधित तक्रारीचे तत्परतेने निराकरण करण्यासाठी स्वागत कक्ष तयार करण्यात आले असून जिल्ह्यातील औदयोगिक ग्राहकांनी महावितरणच्या या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरण अकोला परिमंडलाचे मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर यांनी केले आहे. महावितरणच्या महसुलाचा औद्योगिक ग्राहक हा प्रमुख स्रोत आहे. तसेच औद्योगिक वीज ग्राहकांकडून नियमित आणि वेळेत विजबिल भरणा करण्यात येत असल्यामुळे महावितरणचे अर्थचक्र चालण्यास मदत होते. स्वागत कक्षामुळे औद्योगिक ग्राहकांना वीजसेवा व तक्रारींसाठी स्थानिक कार्यालयाऐवजी आता थेट मंडल स्तरावर संपर्क साधता येणार आहे.त्याचबरोबर




स्थानिक कार्यालयांच्या औद्योगिक ग्राहकसेवांसाठी या कक्षाकडून समन्वय व दैनंदिन देखरेख राहणार आहे. जल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांना तत्पर सेवेसाठी सुरू करण्यात आलेल्या स्वागत कक्षा ला संपर्क करण्यासाठी औद्योगिक वीज ग्राहकांसांठी ७८७५७६३४८१ हा संपर्क क्रमांक आणि swagatcell_buldana@mahadiscom.in ईमेल आय डी उपलब्ध करून देण्यात आला स्वागत कक्षा चे प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता प्रशासन व व्यवस्थापक (वित्त व लेखा) काम पाहणार आहे. या कक्षाकडे संपर्क साधल्यानंतर औद्योगिक ग्राहकांच्या बिलिंग व वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे ताबडतोब निराकरण करण्यात येईल. तसेच नवीन वीजजोडणी, भार वाढ व इतर सेवा देण्यासाठी थेट ग्राहक दारी जाऊन कागदपत्रांची पूर्तता करण्यासह विनाविलंब सेवा दिली जाणार आहे.

# राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी २०२३ मध्ये प्रकाशित पुस्तकासाठी स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्यात येत आहेत. त्यासाठी अर्ज करण्याची मुदत दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत आहे. स्पर्धेसाठी दि. १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके पात्र आहेत. या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ यांच्या कार्यालयात, तसेच जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील. महाराष्ट्र शासनाच्याmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर नवीन संदेश या सदरात स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाड्.मय पुरस्कार २०२२ नियमावली व प्रवेशिका या शीर्षाखाली व व्हाटस् न्यूया सद-रात पुरस्काराच्या शीर्षाखाली, तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्याsahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक व प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करू शकतात. त्याचप्रमाणे, जिल्हाधिकारी कार्यालयात दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत प्रवेशिका दाखल करता येतील. लेखक व प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर किंवा पाकिटावर स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२३ साठी प्रवेशिका असा स्पष्ट उल्लेख करावा. विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्वीकारल्या जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# जिल्ह्यात माझी शाळा, सुंदर शाळा अभियान राबविण्यात येणार...

**जनसंचलन/बुलढाणा**

शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तसेच आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. यासाठी आढावा सभा नुकतीच पार पडली. येथील केंब्रीज स्कूल येथे शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली आढावा सभा पार पडली. सभेत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळाफ अभियान यशस्वीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जयराम भटकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी सिध्देश्वर काळुसे, प्राथमिक शिक्षणाधिकारी बी. एन. खरात, योजना शिक्षणाधिकारी वैशाली ठग, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, उमेश जैन यांनी अभियान यशस्वीपणे राबविण्यासंदर्भात महत्वाच्या सूचना दिल्या. माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचे विभागीय समन्वयक मंगेश भोरसे यांनी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अंतर्गत स्वच्छता मॉनीटर टप्पा क्रमांक - २ मध्ये शाळांची नोंदणी करण्यासंदर्भात कचऱ्याबाबत होणाऱ्या निष्काळजीपणाचे असामाजिक कृत्य रोखण्याची सवय विद्यार्थ्यांना होण्याबाबत मार्गदर्शन केले. अधिव्याख्याता समाधान डुकरे आणि प्राथमिक उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी अभियान राबविताना शाळांची नोंदणी आणि येणाऱ्या अडचणींबाबत सादरीकरण केले. सभेसाठी अधिव्याख्याता श्री. गायकवाड, श्री. गवई, श्री. अजगर, श्री. राजुकुमार, संजय दालमिया यांनी पुढाकार घेतला. या अभियानाचा प्रभावी विस्तार होण्यासाठी शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन, अध्यापन, प्रशासन यात




आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख, अंगभूत कला -क्रीडा गुणांचा विकास आदी घटकांचा अंतर्भाव होणे आवश्यक आहे, तसेच महत्वपूर्ण घटकाना योग्य त्या प्रमाणात प्राधान्य दिल्यास शाळे-चा सर्वांगीण विकास निश्चितपणे होऊ शकतो. यासाठी सर्व शाळांनी यामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी बी. आर खरात यांनी केले आहे.

मराठा महिला अर्बन
को-ओपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा
पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com
तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल
माहितीसाठी संपर्क
सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)
मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# सहकारच्या आर्यन गरुड ची विदर्भाच्या क्रिकेट संघात निवड




**जनसंचलन/बुलडाणा**

सहकार विद्यामंदिर क्रिकेट अकॅडमीचा चि. आर्यन माधवराव गरुड याची १४ वर्ष वयोगटाखालील विदर्भाच्या क्रिकेट संघात निवड झालेली असुन आर्यन हा गेल्या चार वर्षापासुन सहकार विद्यामंदिर क्रिकेट अकॅडमी, बुलडाणा येथे नियमीत त्याची व्हि.सी.ए. संघात लेगस्पीन गोलंदाज म्हणुन निवड झाली आहे. सहकार विद्यामंदिर क्रिकेट अकॅडमीमध्ये उपलब्ध असलेल्या सर्व क्रिकेटच्या सुविधा, उत्कृष्ठ प्रशिक्षक, उत्तम विकेट, व प्रशस्त इनडोर या सर्व सुविधामुळे आपण इथपर्यंत पोहचल्याची कबुली आर्यन याने दिली. आर्यनचे वडील महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असुन बुलडाणा जिल्हयातील पोलीस स्टेशन बुलडाणा ग्रामीण येथे ठाणेदार आहेत, अतिशय शांत स्वभाव असलेले माधवराव गरुड यांनी आर्यन ला व प्रशिक्षकांना वेळो-वेळी क्रिकेट मैदानावर येवुन प्रोत्साहन दिले. आर्यन आपले यशाचे श्रेय आपले प्रशिक्षक संस्थेच्या अध्यक्षा सौ.कोमलताई झंवर, आई-वडील सर्व शिक्षक यांना देतो. त्याच्या या निवडीबद्दल बुलडाणा आर्बनचे संस्थापक राधेश्यामजी चांडक, कार्यकारी अध्यक्ष सुकेशजी झंवर, बुलडाणा जिल्हा क्रिकेट कमिटी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# पाटबंधारे विभागाच्या प्रकल्पामधून गाळ काढण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या धरणामधून शेतीसाठी गाळ काढावा, असे आवाहन पाटबंधारे विभागातर्फे करण्यात आले आहे. धरणामध्ये साठलेल्या गाळामुळे धरणाच्या साठवण क्षमतेत घट झाली आहे. या धरणामध्ये साचलेला गाळ उपसा करून शेतात पसरविल्यास धरणाची मूळ साठवण क्षमता पुनः स्थापित होण्याबरोबरच कृषी उत्पन्नात वाढ होणार आहे. जिल्ह्यामध्ये सन २०२३-२४ मध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे जिल्ह्यातील लघु, मध्यम व मोठे प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. त्यामुळे मार्च २०२४ नंतर धरणातील अंदाजे ५५ हजार ८५ घनमीटर गाळ काढून शेतीकरिता वापरणे शक्य होईल. शेतकऱ्यांना पाटबंधारे विभागाची परवानगी घेऊन देखरेखीखाली शेतीसाठी धरणातील गाळ काढता येणार आहे. शेतकऱ्यांनी स्वखर्चाने शेतीसाठी धरणातील गाळ काढण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सु. शा. सोळंके यांनी केले आहे.

# चांदूर बिस्वा रेल्वे स्टेशनवरील विविध समस्या सोडवण्यात याव्या भुसावळ रेल्वे प्रबंधकांना निवेदनाद्वारे मागणी

**जनसंचलन/ चांदुर बिस्वा**

तालुक्यातील नांदुरा मध्य रेल्वे विभागाच्या मुंबई नागपूर अंतर्गत बिस्वा हे रेल्वे स्टेशन असून येथे विविध समस्या प्रवाशांना भेडसावत असून व नागपूर-भुसावळ ही पॅसेंजर गाडी पूर्ववत सुरू करण्यात यावी, अमरावती सुरत मेमो गाडीला या स्थानकावर थांबा मिळावा यासह आदी समस्याची मागणी चांदुर बिस्वा येथील अंबिका फाउंडेशनचे अध्यक्ष अभय संतोषराव पाटील यांनी रेल्वे प्रबंधक मध्य रेल्वे कार्यालय भुसावल यांना निवेदनाद्वारे केली आहे दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, भुसावल-नागपूर या लोहमार्गावर बिस्वा ब्रिज रेल्वे स्थानक आहे. या स्थानकावर फक्त भुसावळ बडनेरा मेमो व भुसावल वर्धा मेमो गाडी या दोनच गाड्या थांबत आहे. उर्वरित वेळेत कोणत्याच गाड्यांचा थांबा नाही. भुसावळ-नागपूर पॅसेंजर गाडी पूर्ववत सुरू करण्यात यावी. अमरावती-सुरत मेमो गाडी व महाराष्ट्र एक्सप्रेस ह्या गाड्यांचा या स्टेशनवर थांबा देण्यात यावा, तसेच स्टेशनवर ओव्हर ब्रिज असणे गरजेचे आहे, कारण रेल्वे लाईनवर नेहमी मालगाड्या उभ्या असतात त्यामुळे वयवृद्ध प्रवासी, महिला, लहान मुलांना येण्याचा जाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे, तरी त्वरित ओव्हार ब्रिज होणे गरजेचे आहे, असेही दिलेल्या निवेदनात नमूद आहे.

# अवैध धंदे अड्डे बंद करा अन्यथा २६ जानेवारी पासून जिल्हाधिकारी कार्यालयापुढे करणार आंदोलन

## पोलिस प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे कायदा सुव्यवस्थेचे निघाले धिंडवडे...






**जनसंचलन/बुलढाणा**

मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, तसेच जिल्ह्याचे नाव जगभर प्रसिद्ध आहे असे असताना बुलढाणा पोलिस प्रशासनाच्या भ्रष्ट वृत्तीमुळे फार कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहे. बुलढाणा शहरातील चर्च समोर,जयस्तंभ चौक ते गॅरेज लाईन,सुवर्ण गणेश मंदिर समोर टाटा ग्राउंड मध्ये, सुंडरखेड येथील होंडा शो रूम मागे,बजार गल्लीतील शासकीय गाळ्यात, सार्वजनिक बांधकाम विभाग समोर, येळगाव फाटा ,रायपूर,सैलानी, देऊलघाट, चिखली पोलिस स्टेशन हद्दीत शहरातील मध्यवस्तीत बाजार मार्केट येथे खुले आम, वरली, मटके, जुगार अड्डे, नगदी तकदिर का बादशहा असे एक नव्हें अनेक अवैध धंदे जोमात सुरू आहेत या मुळे तरुण पिढी बरबाद होत आहे, अनेक कुटुंबाचे संसार उघड्यावर पडले आहेत, अनेक तरुण व्यसनी बनण्यास सुरुवात झाली आहे, या मुळे अनेक व्यक्ती, गुंड मोकाट फिरत आहेत, दिवसा ढवळ्या लुटमार होत आहे, अनेक महिलांचे दागिने खुलेआम पळविले जात आहेत त्या मुळे पोलिस अधिकारी कर्मचारी यांचा वचक राहिलेला नाही, गावगुंड बाजार मार्केट मद्ये मोबाईल फोन चोरत आहे, या बाबद अर्जदार १)इसरार अहमद देशमुख, वॉर्ड नं ४ गवलीपुरा, पुरुषोत्तम बोर्डे यांनी अनेक बातम्या प्रकाशित केल्या आहेत व येथिल लोकप्रतिनिधी,सामाजिक कार्यकर्ते यांनी अनेक आंदोलन केले, निवेदन दिले मात्र येथील भ्रष्ट पोलिस प्रशासन आधिकारी कोणतीही कार्यवाही करत नाहीत, उलट तक्रार दाखल करणाऱ्यास धमकी देऊन तक्रार माघे घेण्यास प्रवृत्त केले जाते,त्या मुळे सबंधित पोलिस स्टेशन आधिकारी कर्मचारी यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर तत्काळ कारवाई करावी व रायपूर, चिखली, बुलढाणा पोलिस स्टेशन हद्दीतील सर्व अवैध धंदे,जुगार अड्डे,वरली, मटका बंद करावा, अन्यथा २६जाने वारी पासून इसरार देशमुख व पुरुषोत्तम बोर्डे जिल्हाधिकारी कार्यालय समोर बेमुदत तीव्र आंदोलन करनार आहोत तसेच आंदोलन काळात तक्रार कर्त्यास काही इजा पोहचली, जिवित्वास हानी झाल्यास त्याची सर्व जबाबदारी प्रशाशन व अवैध धंदे माफिया यांच्यावर राहिल अशी तक्रार इसरार अहमद देशमुख संपादक बुलढाणा समाचार न्यूज चॅनल. बुलढाणा पुरुषोत्तम बोर्डे युवा प्रदेशाध्यक्ष अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद महाराष्ट्र यांनी सर्व संबंधितांना तक्रार दिली आहे दिली

## क्रीडा स्पर्धा मुळे आतंरराष्ट्रीय खेळाडू तयार होतात - ॲड. विजय सावळे

# परिवार अर्बन चषक स्पर्धा उत्साहात संपन्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा येथील परिवार अर्बन यांच्या तर्फे व परमवीर क्रिकेट क्लबच्या सहकायाने शासकीय डी एड कॉलेज च्या मैदानावर क्रिकेट प्रेमीसाठी क्रिकेटचे खुले सामने आयोजित करण्यात आले होते. ही स्पर्धा १२ जानेवारी ते १७ जानेवारी पर्यंत आयोजित करण्यात आली होती. परिवार अर्बन चषकमध्ये जिल्हा भरातून ३२ क्रिकेट उत्कृष्ट संघांनी उत्कृष्ठ सहभाग नोंदविला आहे.३० संघावर मात करत अंतिम सामना हा अगतस्य ११ व एकलव्य क्रिकेट संघ बुलढाणा या संघामध्ये पार पडला. अंतिम सामना च्या लढतीत अगत्स्य ११ या संघाने प्रथम फलदाजी करत एकलव्य क्रिकेट संघ समोर ८ षटाकात ११० धावांचे लक्ष्य ठेवले. धावांचा पाठलाग करतांना एकलव्य संघाकडून प्रसाद फदाट यांच्या फलदाजी च्या जोरावर एकलव्य संघाने ७ षटकातच सामना आपल्या नावावर करत परिवार अर्बन चषक विजेते पद पटकावले आहे. परिवार अर्बन चषक मध्ये एकलव्य क्रिकेट संघ बुलढाणा विजेते, अगत्स्य ११उपविजेते, सुरज ११ बुलढाणा उत्कृष्ट खेळ या संघासह, ओम साई संघ, पांगरी ११, रोहिनखेड ११, मोताळा भाई स्पोर्ट्स, उदयनगर ११, राजे संभाजी चिखली, भादोला फ्रेंड्स, या संघाने सहभाग नोंदविला होता. विजेते -उपविजेते व इतर सर्व खेळाडू यांना परिवार अर्बनचे तज्ञ् संचालक व बार असोसिएशन जिल्हा अध्यक्ष ॲड. विजय सावळे, संचालक शैलेश दादा कुलकर्णी,संचालक मंगल हिवाळे, किशोर हटकर,डॉ गजानन गावंडे, ॲड. गजानन नरवाडे, परिवारांचे कार्यकारी संचालक नितीन कानडजे,अजय जाधव, गजानन खंदारे,विपूल खोटाळे,आयटी प्रमुख प्रशांत इंगळे,उपस्थितत होते.. या वेळी मान्यवर यांच्या हस्ते मॅन ऑफ द मॅच ठरलेले प्रसाद फदाट



व उत्कृष्ट गेंद बाज अनिकेत परिहार व स्वप्नील पोपळघट यांना सन्मान चिन्ह व रोख स्वरूपातील धनादेश देऊन गौरविण्यात आले. निर्णय क्षमता, सहानुभूती, शिस्त व सहकार्याची भावना निर्माण होऊन खेळामुळे खेळाडूंचा सर्वांगीन विकास व्हावा या हेतूने परिवार अर्बन चषक स्पर्धा राबवित असल्याचे परिवार अर्बनचे तज्ञ संचालक ॲड. विजय सावळे यांनी व्यक्त केली.. परम वीर क्लब आयोजित परिवार अर्बन चषक मध्ये श्री ओम साई मार्बल, साई मॉल बुलढाणा, मोरे मॅथमॅटिक्स क्लास, साईराज मेन्स वेअर, शुभम सुरडकर, रोहित मोरे, अमोल देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## पान १ वरून भ्रष्टाचारातील बड्या माशांवर...

खरे तर हा सामुहिक अपराध आहे, त्यामुळे उद्या या सर्वांवर मकोकासारखे गंभीर कायदे लागू केले पाहिजेत. कारण सगळा भ्रष्टाचार हा एकमेकांच्या हातात-हात घालून करण्यात आलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी गेल्या काही वर्षात येऊन गेलेल जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य अधीक्षक, भांडारपाल, रोखपाल अशा अनेकांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करणे गरजेचे आहे. भांडारपाल प्रकाश बोथे हे केवळ हिमनगाचे टोक आहे. जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार उकरून काढायचे म्हटले तर या ठिकाणी भरपूर काही सापडू शकते आणि बडे-बडे मासे गळाला लागू शकतात. तेवढे ठोस पुरावे आमच्याकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे केवळ बोथे यांच्यावर कारवाई करून हे प्रकरण थांबायला नको तर या ठिकाणच्या इतर अनेक अधिकाऱ्यांची ही सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित. आरोग्य उपसंचालक, राज्याचे आरोग्य आयुक्त या सर्वांनी यात लक्ष घालून यासंदर्भात कारवाई अपेक्षित आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन यात पुढाकार तर घेतच आहे, आणि यापुढेही घेत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचा मंगळवारी मेळावा

**जनसंचलन/बुलडाणा**



साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यासाठी मंगळवार, दि. २३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, चिखली रोड येथे मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित मार्फत मातंग समाज व तत्सम जातीतील कुटुंबाची सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत, यासाठी महामंडळाने नाविण्यापुर्ण योजना सुरु केली आहे. महामंडळाचे भागभांडवलात वाढ होवून एक हजार कोटी झाले आहे. साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, बार्टी तर्फे राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत आणि शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याकरता योजनांचा प्रचार आणि प्रसार करण्याकरीता महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक, बार्टी कार्यालयाचे अधिकारी मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. महामंडळाच्या नवीन योजना सुविधा लोन, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक कर्ज योजना, थेट कर्ज योजना आदी नाविण्यापुर्ण योजनांची माहिती मेळाव्यात देण्यात येणार आहे. मेळाव्याला जिल्ह्यातील मातंग समाज, तत्सम जातीतील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेला सुरवात....

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा सन २०२३-२४ चे आयोजन जिजामाता क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. या स्पर्धेला आजपासून सुरवात झाली आहे. या स्पर्धेत २३ लाख रूपयांचे बक्षीसे देण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण ५०० पदक, ३२संघ, ८ विभाग सहभागी होत आहे. राज्य व्हॉलीबॉल संघटना, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने श्री शिवछत्रपती व्हॉलीबॉल चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा दि. २२ जानेवारी २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे. स्पर्धेमध्ये राज्यामधील आठ विभागाचे १९ व २१ वर्षाखालील मुले व मुली सहभागी झाले आहे. स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाराज चषक प्रतिकृतीसह रोख बक्षीस देण्यात येणार आहेत. यात २१ वर्षाखालील मुले प्रथम क्रमांक २० हजार रूपये, २१ वर्षाखालील मुली प्रथम क्रमांक २० हजार रूपये, १८ वर्षाखालील मुले प्रथम क्रमांक २० हजार रूपये, १८ वर्षाखालील मुली प्रथम क्रमांक २० हजार रूपये, २१ वर्षाखालील मुले द्वितीय क्रमांक.१५ हजार रूपये, २१ वर्षाखालील मुली द्वितीय क्रमांक १५ हजार रूपये, १८ वर्षाखालील मुले द्वितीय क्रमांक १५ हजार रूपये, १८ वर्षाखालील मुली द्वितीय क्रमांक १५ हजार रूपये, २१ वर्षाखालील मुले तृतीय क्रमांक १० हजार रूपये, २१ वर्षाखालील मुली तृतीय क्रमांक १० हजार रूपये, तसेच विजयी चमु व खेळाडूंना प्रथम क्रमांक १८ ते २१ वर्षाखालील मुले व मुली ४८ सुवर्ण पदके, द्वितीय क्रमांक १८ ते २१ वर्षाखालील मुले व मुली ४८ रौप्य पदके, तृतीय क्रमांक १८ ते २१ वर्षाखालील मुले व मुली ४८




कांस्य पदके देण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण २३ लाख ३६ हजार रूपयांची बक्षीसे देण्यात येणार आहे. स्पर्धा सकाळी ७ ते १० व सायंकाळी ६ ते १० पर्यंत चालणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन दि. १९ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. स्पर्धेसाठी चार व्हॉलीबॉल कोर्ट तयार करण्यात आले आहे. स्पर्धेकरीता तांत्रिक तज्ज्ञ तालुका क्रीडा अधिकारी श्याम देशपांडे, स्पर्धा निरीक्षक म्हणून कॅप्टन अशोक राऊत आहेत.

## आता नांदुरा अर्बन बँकेला का आठवला पत्रकार दिन?

**जनसंचलन/ नांदुरा**

लोकशाहीत पत्रकारितेला महत्त्वाचे स्थान आहे, जनतेच्या हिताकरिता अन्याय विरुद्ध पत्रकार आपल्या जीवाची बाजी लावून लढत असतात, आम्ही ही तो वसा चालवत आहे, त्यामुळे पत्रकारांचा सन्मान झाला असल्यास त्यात काही गैर नाही. परंतु नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड यांनी आता पर्यंत कधी पत्रकार दिन केला व पत्रकारांचा मान सन्मान केल्याचे ऐकिवात नाही किंवा प्रसिद्धी नाही, असे एका ज्येष्ठ पत्रकाराने सांगितले परंतु आपण बँकेच्या गैरकारभारा विरुद्ध आवाज उठवल्याने बँकेला पत्रकार दिन आठवला की काय? असे बोलता बोलता बोलून गेले व काही का असेना काही विशिष्ट आपल्या पत्रकार बांधवांच्या पुढे नतमस्तक



होऊन मान ही द्यावा लागतो हे ही तेवढेच खरे! पण बँकेने पत्रकार दिनी केलेल्या खर्चाची तरतूद बँकेतून होती किंवा कसे याचाही जबाब देणे सभासदांच्या हिताकरता जरुरी आहे,

## महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना दोन टप्प्यात राबविण्यात येणार...

**जनसंचलन/बुलडाणा**

मुद्रांक शुल्क भरलेला नसणे किंवा नियमापेक्षा कमी मुद्रांक शुल्क भरलेल्या अथवा नोंदणी केलेली नसलेल्या दस्तांसाठी सरकारने महाराष्ट्र शुल्क अभय योजना राबविण्यास मान्यता दिली आहे. दि. १ डिसेंबर २०२३ पासून दि. ३१ जानेवारी २०२४ आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ अशा दोन टप्प्यांत ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहजिल्हा निबंधक रमेश पगार यांनी केले आहे.

मुद्रांक शुल्क अभय योजनेमध्ये कमी स्टॅम्प ड्युटी भरलेल्या जुन्या दस्तांवरील मुद्रांक शुल्कामध्ये आणि दंडामध्ये मोठ्याप्रमाणात सूट दिली आहे. दि. ०१ जानेवारी १९८० ते दि. ३१ डिसेंबर, २००० या कालावधीत निष्पादित केलेल्या ज्या दस्तांमध्ये कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाखापेक्षा कमी असणार आहे. अशा दस्तांवरील कमी भरलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क माफ करण्यात येऊन व त्यावरील दंडाची रक्कम देखिल संपूर्णपणे माफ करण्यात आली आहे. तर, कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम ही १ लाखापेक्षा जास्त असेल तर, कमी भरलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये ५० टक्के सूट देऊन त्यावरील दंडाची संपूर्ण रक्कम माफ करण्यात आली आहे. दि. १ जानेवारी, २००१ ते दि. ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीमध्ये निष्पादित केला असेल तर, अशा दस्तांवर देखिल कमी भरलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये २५ टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येऊन त्यावरील दंड हा २५ लाख ते १ कोटी मर्यादेपर्यंतच वसुल करण्यात येणार आहे. त्यापेक्षा जास्त दंडाची रक्कम असेल तर, ती संपूर्णपणे माफ केली जाणार आहे. काही कारणास्तव पहिल्या टप्यामध्ये सवलत घेण्यासाठी अर्ज करण्यास विलंब झाला तर दुसऱ्या टप्यामध्ये देखिल सवलतीसाठी अर्ज करण्याची मुभा आहे. परंतु, हा लाभ हा कमी प्रमाणात मिळेल.



या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्यासह नोंदणी महानिरीक्षक कार्यालयात विशेष नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. अभय योजनेसाठी अर्जदार यांना संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी किंवा दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात समक्ष किंवा ऑनलाईन अर्ज करता येतील. अर्जाचा नमुना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या संकेतस्थळावर .. तसेच, सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच योजनेची सविस्तर माहिती या विभागाच्या .. वर प्रकाशने परिपत्रक-मुद्रांक अभय योजना या सदराखाली उपलब्ध आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958